# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६२१२२८
२५६२१२२९
ई—मेल:
pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

संदर्भ : साफुपुवि/निववि/१५३ दिनांक : ०६/०३/२०२०

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
संबंधित संलंग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे ४११००७.

विषय — **सन २०१९—२० मधील गुणवत्ता सुधार योजनेतंर्गत केंद्रीय पध्दतीने हिशेब सादर करण्याबाबत.**

संदर्भ — १. पत्र क्र. साफुपुवि/निववि/७१३, दि. १५ नोव्हेंबर, २०१९
२. पत्र क्र. साफुपुवि/निववि/७९९, दि. २३ डिसेंबर, २०१९.
३. पत्र क्र. साफुपुवि/निववि/८००, दि. २३ डिसेंबर, २०१९.
४. पत्र क्र. साफुपुवि/निववि/२९, दि. १५ जानेवारी, २०२०.

महोदय/महोदया,

वरील संदर्भीय विषयास अनुसरून कळविण्यात येते की, सन २०१९—२० मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत सादर केलेल्या प्रस्तावापैकी गुणवत्ता सुधार योजनेच्या मार्गदर्शक तत्वास अनुसरून पात्र ठरलेल्या यादीतील महाविद्यालये व परिसंस्थांना संदर्भीय पत्रान्वये अर्थसहाय्य मंजूर केलेले आहेत.

**सदर परिपत्रकामध्ये खालीलप्रमाणे उल्लेख करण्यात आला होता : —**

“राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदांचे आयोजनासाठी महाविद्यालय/परिसंस्थांनी त्यासाठी वापरलेल्या निधीची मार्चमध्ये होणा—या लेखापरिक्षण शिबीरानंतर प्रतिपूर्ती होते. सदर परिपूर्ती लवकर होण्याच्यादृष्टीने कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदांचे आयोजनानंतर वरील सर्व बाबींची पूर्तता केल्यानंतर संबंधित कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदांच्या हिशेबांची कागदपत्रे विद्यापीठाकडे त्वरीत सादर करावीत व त्याचप्रमाणे महाविद्यालयाच्या बॅक खात्यासंबंधीची माहिती विद्यापीठ संकेतस्थळावर अपलोड करण्यात यावी. जेणेकरून आयोजित केलेल्या कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदांच्या खर्चाची प्रतिपूर्ती विद्यापीठाकडून लवकर करणे सुकर होईल. ”

परंतु **विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयानुसार सन २०१९—२० या आर्थिक वर्षामध्ये ज्या महाविद्यालये/परिसंस्थांना गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलेले आहे, त्यांनी खाली नमूद केलेल्या ठिकाणी केद्रींय पध्दतीने हिशोब सादर करणे अनिवार्य आहे. त्यानंतर विद्यापीठामार्फत कोणतेही हिशेब स्विकारले जाणार नाहीत व कोणत्याही प्रकारे अर्थसहाय्य अदा केले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.**

| जिल्हा/शहर | वार व दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|
| नाशिक | रविवार, २२/०३/२०२० | सकाळी ९ ते ५ | विद्यापीठ उपकेंद्र, नाशिक |
| अहमदनगर | सोमवार, २३/०३/२०२० | सकाळी १० ते ५ | बीपीएचई सोसायटीचे इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज करिअर डेव्हलपमेंट रिसर्च, आयएमएस कॅम्पस, स्टेशन रोड, अहमदनगर. |
| पुणे शहर | गुरूवार, २६/०३/२०२० | सकाळी ९ ते ५ | पर्यावरणशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे. |
| पुणे जिल्हा (ग्रामीण) | शुक्रवार, २७/०३/२०२० | सकाळी ९ ते ५ | |

१. ज्या महाविद्यालये/परिसंस्थांना गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय कार्यशाळा/परिषद/चर्चासत्रासाठी अर्थसहाय्य मंजूर झाले आहे त्या महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी कार्यशाळा/चर्चासत्र/परिषद संपल्यानंतर ७२ तासांच्या आत सहभागी व्यक्तींची माहिती विद्यापीठाच्या **http://bcud.unipune.ac.in→Login→Menu →Planning and Development →Submit Participant Details** या लिंकवर सादर करणे बंधनकारक आहे.

२. वरीलप्रमाणे सहभागी व्यक्तींची माहिती संबंधित महाविद्यालयाने/परिसंस्थेने सादर केल्यानंतर विद्यापीठ पातळीवर मार्गदर्शक तत्वांप्रमाणे सहभागी व्यक्तींना मान्यता देण्याची कार्यवाही ऑनलाईन पध्दतीने केली जाते.

३. वरील दोन मध्ये नमूद केल्याप्रमाणे विद्यापीठाने ऑनलाईन पध्दतीने पात्र सहभागी व्यक्तींना ऑनलाईन पध्दतीने मान्यता दिल्यानंतर संबंधित महाविद्यालयास/परिसंस्थेस त्यांच्या **BOD Login** मधून विद्यापीठाने मार्गदर्शक तत्वांप्रमाणे मान्य केलेल्या सहभागी व्यक्तींची कागदपत्रे (ओळखपत्र, कर्तव्य रजेची कागदपत्र, पासपोर्ट व व्हिसा इ.) छापता (Print) करता येतात.

४. वरील तीन मध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधित महाविद्यालयाच्या/परिसंस्थेच्या **BOD Login** मधून विद्यापीठाने मान्यता दिलेल्या सहभागी व्यक्तींच्या कागदपत्रांच्या (ओळखपत्र, कर्तव्य रजेची कागदपत्र, पासपोर्ट व व्हिसा इ.) प्रती छापून (Print Out) त्या हिशोबासोबत जोडणे आवश्यक आहे.

जी महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी सदर कार्यशाळा/चर्चासत्र/परिषद संपल्यानंतर ७२ तासांच्या आत सहभागी व्यक्तींची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अपलोड करणार नाहीत, अशा महाविद्यालयांचे/परिसंस्थांचे कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदेचे हिशेब स्विकारले जाणार नाहीत, याची संबंधित महाविद्यालयांनी नोंद घ्यावी. तसेच केंद्रीय पध्दतीने हिशेब सादर करण्याबाबत विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागाचे परिपत्रक जा. क्र. १९३० दि. ०५/०३/२०२० चे तंतोतंत पालन करण्यात यावे.

आपला,

6/3/2020

(मुं. वि. रासवे)
उपकुलसचिव,
नियोजन व विकास विभाग